महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना 2020/प्रक्र.58/आरोग्य-5, दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/348, दिनांक 02 जुलै,2020

5. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/362, दिनांक 13 जुलै, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/368 दिनांक १८ जुलै, 2020

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जळगांव जिल्हयामध्ये कोव्हिड-19 बाधित व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरीकांना वेळोवेळी सुचना, निर्देश, आदेश निर्गमित करुनही नागरीक / व्यक्ती मोठया प्रमाणावर अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी गर्दी करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कोव्हिड-19 विषाणूचा संसर्ग रोखण्यास अडचणी निर्माण होत असल्याने मार्केट परिसरात नागरीकांची होणारी अनावश्यक गर्दी कमी करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव महानगरपालिका क्षेत्राकरीता पुढील आदेश होईपावेतो खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**अ)20 पेक्षा अधिक दुकाने एकत्र असणा-या मार्केट क्षेत्र / परिसराकरीता** -

1) जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मार्केट परिसरात / क्षेत्रामध्ये 20 पेक्षा जास्त दुकाने (Shops) एकत्रित असतील अशा दुकान मालकांना / चालकांना केवळ **दुपारी 12 ते 4** या वेळेतच मालाची घरपोच विक्री (Home Delivery) करता येईल.

2) वरील प्रमाणे मालाची घरपोच विक्री ( Home Delivery) करतांना दुकानात केवळ दुकान चालक व त्यांचे दोन प्रतिनिधी यांनाच प्रवेश असेल व त्यांनी ओळखपत्र जवळ बाळगणे अनिवार्य असेल.

3) घरपोच मालाची विक्री ( Home Delivery) करतांना संबंधितांनी चेह-यावर मास्क लावणे व सोबत सॅनिटाईजर्स बाळगणे अनिवार्य असेल. तसेच घरपोच मालाची विक्री करीत असतांना किमान ग्राहकांपासून 06 फुट अंतर ठेवणे आवश्यक राहील.

**ब) 20 पेक्षा कमी दुकाने एकत्र असणा-या मार्केट क्षेत्र / परिसराकरीता** -

1) जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मार्केट परिसरात / क्षेत्रामध्ये 20 पेक्षा कमी दुकाने (Shops) एकत्रित असतील अशी दुकाने ग्राहकांना खरेदीसाठी सुरु राहतील. संबंधित दुकान मालक / चालक यांना मालाची विक्री **सकाळी 09.00 ते सायं.07.00 वाजेपर्यंत** On the Counter करता येईल किंवा Home

**Delivery** करता येईल. सदर मार्केट परिसरातील दुकाने आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांनी यापूर्वी लागू केलेल्या **सम-विषम** दिनांकाच्या निकषांप्रमाणेच सुरु राहतील. **सदर दुकानांच्या बाबतीत रस्ता पूर्व-पश्चिम असल्यास दक्षिण बाजूकडील दुकाने सम दिनांकास तर उत्तर बाजूकडील दुकाने विषम दिनांकास आणि रस्ता दक्षिण-उत्तर असल्यास रस्त्यांच्या पूर्व बाजूकडील दुकाने सम दिनांकास तर पश्चिम बाजूकडील दुकाने विषम दिनांकास उघडी राहतील अशा पध्दतीने सर्व दुकाने सुरु राहतील.**

2) तथापि वर नमूद केलेली दुकाने, आस्थापना, शॉप्स यांनी मालाची विक्री करण्याचा जास्तीत जास्त भर हा घरपोच मालाची विक्री ( Home Delivery) यावर द्यावा.

3) कपड्यांच्या दुकानातील ट्रायल रुम दुकानदारांना सुरु ठेवता येणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत **Exchange & Return Policy** सुरु ठेवता येणार नाही.

4) संबंधित दुकानांच्या ठिकाणी **एकाच वेळी 05 पेक्षा अधिक** ग्राहक एकत्र येणार नाहीत. तसेच त्या ठिकाणी Social distancing चे पालन केले जाईल, याची अंतीम जबाबदारी संबंधित दुकानाचे चालक/ मालक यांची राहील.

5) सर्व नागरीकांना दुकानात जात असतांना चेह-यावर मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील. तसेच दुकानाच्या ठिकाणी सॅनिटाईजर्स, हात धुण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित दुकानांचे चालक/ मालक यांची राहील.

6) **जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीतील गर्दीच्या ठिकांणाकरीता** या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेले आदेश **दिनांक 13 जुलै**, 2020 अन्वये लागू करण्यात आलेले **No Vehicle Zone** बाबतचे निकष पूर्वी प्रमाणेच अबाधितपणे लागू राहतील.

वर नमूद परिच्छेद अ व ब मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यात कसूर केल्यास संबंधित दुकान , आस्थापना, शॉप्स हे तात्काळ सिल केले जातील, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 18 /07/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
7. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
8. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
9. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.